# जाहीर प्रकटन

**विषय – जि.प.अहमदनगर कडील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे व इतर ल.पा.योजनांची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी सहकारी पाणीवापर संस्था स्थापन करणेबाबत**

---

जिल्ह्यातील जि.प.च्या अखत्यारितील अस्तित्वात असलेले सुमारे १४३ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे जिल्हा परिषदेमार्फत पूर्ण करून देखभाल दुरुस्तीसाठी पाणी वापर संस्था स्थापन न झाल्याने संबंधित ग्रामपंचायतींकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. परंतु सध्या पाणी वापर समित्या अस्तित्वात नसल्याने या को.प. बंधा-यांची देखभाल-दुरुस्ती न झाल्याने तसेच वेगवेगळया कारणांनी दरवाजे उपलब्ध नसल्यामुळे तसेच उपलब्ध दरवाजे वेळेवर न बसविल्यामुळे को.प.बंधाऱ्यांमध्ये पाणी अडविण्याबाबत अडचणी येत आहेत. त्यामुळे या प्रकल्पांचे अपेक्षित सिंचनाचे लाभ संबंधित लाभार्थ्यांना मिळत नाहीत. या अडचणींवर मात करण्यासाठी व लाभार्थींना आवश्यकतेनुसार सुलभतेने पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीकोनातून को.प.बंधा-यांच्या सिंचन व्यवस्थापनेत लाभधारकांचा सक्रिय सहभाग असणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्व को.प.बंधा-यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी लाभधारकांच्या सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्याबाबत सूचना असतानाही त्यांची स्थापना करण्यात आलेली नाही. म्हणून आता त्या पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

एखाद्या प्रकल्पावर सहकारी संस्था स्थापन होऊ शकली नाही तर संबंधित गावातील विकास सोसायटी / अशासकीय संस्था / स्वयंसंवी संस्थाही को.प.बंधारे व इतर ल.पा.योजनांच्या देखभाल / दुरुस्तीचे काम ना नफा ना तोटा या तत्वावर सेवाभावी वृत्तीने करण्यास तयार असल्यास त्यांनीही प्रस्ताव ग्रामपंचायतीमार्फत सादर करावेत. संबंधित संस्थेस लाभार्थ्यांकडून नियमानुसार पाणीपट्टी जमा करुन बंधा-याची देखभाल दुरुस्ती करण्याची मुभा असेल.तथापी संबंधित संस्थेस को.प.बंधा-याची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी विहित नमुन्यात करारनामा संबंधित ग्रामपंचायत व जिल्हा परिषद अहमदनगर बरोबर करावा लागेल. करारनाम्याचा नमुना जिल्हा परिषद अहमदनगरचे संकेतस्थळ *www.nagarzp.gov.in* यावर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

तरी सर्व कोल्हापूर पद्धतीचे बंधारे तसेच इतर ल.पा.योजनांच्या लाभार्थ्यांनी सहकारी पाणीवापर संस्था स्थापन करुन किंवा सेवा सहकारी सोसायटी किंवा अशासकीय स्वयंसेवी संस्थेमार्फत चालू वर्षीच्या पावसाळयामध्ये १०० टक्के पाणी साठा करणेसाठी आखण्यात आलेली विशेष मोहिम यशस्वी करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

अधिक मार्गदर्शन व पुढील कार्यवाहीसाठी संपर्क अधिकारी – १. कार्यकारी अभियंता , जि.प.ल.पा.विभाग अहमदनगर

२. उपअभियंता जि.प.ल.पा./ग्रा.पा.पु. उपविभाग (संबंधित तालुका)

कार्यकारी अभियंता
लघुपाटबंधारे विभाग
जिल्हा परिषद अहमदनगर

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर